जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

Email ID-dycolvpakola@gmail.com                    Website- http://akola.nic.in

क्र.कक्ष-१९ ग्रापनि/जिप/पंस/कावि- 230 /२०२५                    दिनांकः- 22/08/२०२५

प्रति,

१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अकोला
२) उपविभागीय अधिकारी,अकोट,अकोला,मुर्तिजापूर,बाळापूर
३) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, अकोला
४) तहसिलदार,तेल्हारा,अकोट,मुर्तिजापूर,अकोला, बाळापूर,बार्शिटाकळी,पातुर
५) गटविकास अधिकारी,पंचायत समिती, तेल्हारा,अकोट,मुर्तिजापूर, अकोला, बाळापूर, बार्शिटाकळी, पातुर
६) जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला
७) जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

विषयः-जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२५ अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे बाबत...

संदर्भः- १) मा.ग्रामविकास विभाग यांचे पत्रक्र, क्रमांकः जिपनि-२०२५ प्र.क्र.३६/पं.रा-२. दि.१२ जून २०२५.
२) मा. ग्रामविकास विभाग यांचे शासन आदेश क्रमांकः जिपनि २०२५ प्र.क्र.३६/पं.रा-२. दि.१२ जून २०२५.
३) मा. रा.निवडणूक आयोग यांचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.१९/का.७ दि.१२ऑगस्ट,२०२५
४) मा.ग्रामविकास विभाग यांचे पत्र क्रमांक जिपनि-२०२५ प्र.क्र ३६/पं.रा-२. दि. १८ ऑगस्ट, २०२५.
५) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१९/जिप/पंस/ग्रापनि/कावि-२२३/२०२५ दिनांक १८ ऑगस्ट, २०२५
६) मा. विभागीय आयुक्त अमरावती, यांचे पत्र क्र. विकास/आस्था/नि/कावि-६५९/२०२५ दि. २२ ऑगस्ट, २०२५

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, मा.ग्रामविकास विभाग यांचे पत्र क्र. जिपनि २०२५ प्र.क्र. ३६/पं.रा-२. दि.१२ जून २०२५ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रभागाच्या भौगोलिक सिमा निश्चित करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या कार्यालयातील वरिल संदर्भिय पत्रान्वये अंतिम प्रभाग रचनेबाबत प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे अंतिम मान्यते करिता सादर करण्यात आले होते. संदर्भ क्र.६ नुसार आज दिनांक २२/०८/२०२५ रोजी मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर अंतिम प्रभाग रचनेला मान्यता प्रदान केली आहे. तसेच अंतिम प्रभाग रचना आज दिनांक २२/०८/२०२५ रोजी प्रसिध्द करण्याबबात शासनाचे निर्देश आहेत.

मा. ग्राम विकास विभाग यांचे शासन आदेश क्रमांक. जिपनि २०२५ प्र.क्र.३६/पं.रा-२. दि.१२ जून २०२५ नूसार निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेचे अंतिम जिल्हाधिकारी कार्यालय,पंचायत समिती कार्यालय, तसेच जिल्हयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याचे सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार अकोला जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक -२०२५ करिता निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेचे अंतिम प्रभाग रचना, आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर दिनांक २२/०८/२०२५ रोजी प्रसिध्द करुन प्रसिध्द केल्याबाबतचा अहवाल उलट टपाली आजच या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**सहपत्रः**- वरिल प्रमाणे

Nvarf 22.8.25

(वर्षा मीना,भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, अकोला

प्रतः-

१) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांना माहिती करिता सविनय सादर.
२) मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.